# मूलनिवासी अधिकार परिषद


गुरु संत रैदास


छ. शिवाजी महाराज


राष्ट्रपिता जोतीराव फुले


राजर्षि शाहूजी महाराज


जननायक बिरसा मुंडा


पेरियार ई. वी. रामासामी


डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## शासक जातींवर आरोप पत्र

प्रिय मूलनिवासी बहुजन बांधवांनो,

स्वातंत्र्यानंतर २६ जानेवारी १९५० पासून संविधानानुसार आपल्या देशाचा कारभार सुरु झाला. सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य आणि समता प्रदान करण्याचे अभिवचन याप्रसंगी देण्यात आले. सोबतच संविधानानुसार आपण सांसदिय लोकशाही चा स्वीकार केला. याद्वारे प्रौढ मतदानाच्या माध्यमातून 'एक व्यक्ती एक मत एक मूल्य' हा सिद्धांत लागू झाला. परंतु अत्यंत दुःखद बाब ही आहे कि भारतीय राज्यघटनेला अंमलात येऊन ६० वर्षे होऊन देखील आपल्या संविधान निर्मात्यांचे लोकतांत्रिक समाज निर्माण करण्याचे स्वप्न हे आजही स्वप्नच राहिले आहे. शासकजातींनी त्यांचे वर्चस्व त्यांच्या पैशाच्या ताकतीने आजतागायत कायम ठेऊन संविधाननिर्मात्यांचे स्वप्न साकार होऊ दिलेले नाही.

या देशात मूलनिवासी बहुजन समाजाच्या हिताचे जे काही कायदे तयार करण्यात आले होते त्यावर शासकजातींनी जाणूनबुजून अंमलबजावणी केली नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी मूलनिवासी बहुजन समाजच्या हिताचे नवीन कोणतेही कायदे तयार केले नाहीत व होऊ दिले नाहीत.

भारतीय राज्यघटनेला ६० वर्षे झाली आहेत. आपण आता कोणतीही वाट न पाहता संसदेवर कब्जा केलेल्या शासकजातींना याबाबत जनतेच्या न्यायालयात जाब विचारणे आवश्यक आहे. म्हणून शासकजातींवर हे आरोपपत्र जनतेच्या न्यायालयात दाखल करीत आहोत.

## आर्थिक धोरण

१. १९९१ पासून शासक जातींनी, उदारीकरण, खाजगीकरण व जागतीकीकरण म्हणजेच लिब्रलायझेशन, प्रायव्हेटायझेशन व ग्लोबलायझेशन (एलपीजी) या धोरणावर अंमलबजावणी सुरु केली.

२. या एलपीजी च्या धोरणामुळे आपल्या केवळ आर्थिक जीवनावरच नव्हे तर सामाजिक व शैक्षणिक जीवनावर देखील वाईट परिणाम झाला आहे.

३. 'एलपीजी' च्या माध्यमातून यादेशातील लोकांना असंख्य रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतील असा खोटारडा प्रचार शासकजातींनी त्यावेळी केला होता.

४. ही बाब खरी आहे कि एलपीजी च्या माध्यमातून मूलनिवासी बहुजन समाजाच्या युवकांना रोजगार नाकारुन शासकजातींनी त्यांच्या मूलांच्या रोजगाराची व्यवस्था मात्र केली आहे.

५. एलपीजी मूळे रोजगाराची कोणतीच संधी शासक जातीचे लोक मूलनिवासी बहुजन समाजाला देत नाहीत. असे करुन ते आम्हाला रोजगारापासून वंचित ठेवतात.

६. शासक जातींनी, सरकारी मालकीच्या कंपन्याचे (व्हीएसएनएल, बाल्को, हॉटेल कॉर्पोरेशन चे हॉटेल्स आदि.) खाजगीकरण करुन भांडवलदारांना विकून टाकले व आम्हा मूलनिवासी

बहुजन समजाचे रोजगार हिसकावून घेतले आहेत. खाजगीकरण करतांना अनुसूचित जाती, जमाती व अन्य मागास वर्गाला आरक्षित वर्गाला सुरक्षा करारात नोक-यांमध्ये आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली होती. परंतु संबंधीत खाजगी कंपन्यांनी त्याचा मान राखला नाही. परिणामतः सर्वोच्च न्यायालयात यासंबधीचे खटले सुरु आहेत.

७. केवळ सरकारच्या मालकीच्या कंपन्यांचेच खाजगीकरण झाले नाही तर शिक्षणाचेही खाजगीकरण करण्यात आले आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षण अत्यंत महाग झाले आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी सारखे व्यावसायीक शिक्षणाचा खर्च हा खाजगीकरणामुळे मूलनिवासी बहुजन समाजाच्या आवक्याबाहेर गेला आहे.

८. सरकारी कंपन्या, शिक्षण क्षेत्र यानंतर शासकजातींनी योदशातील मूलनिवासी बहुजनांच्या सुपीक जमिनींना पण विकून टाकण्याचा घाट घातला आहे. याकरीता उदारीकरणाच्या नावावर भांडवलदारधार्जिण्या शासक जातींनी "स्पेशल ईकॉनॉमिक झोन" (सेझ) म्हणजेच "विशेष आर्थिक क्षेत्र" चा कार्यक्रम घोषित केला. या सेझ च्या नावाखाली मूलनिवासी बहुजन समाजाच्या मालकीची सुपीक जमीन जबरदस्तीने ताब्यात घेऊन ती भांडवलदारांना विकण्याचा घाट शासकजातींनी घातलेला आहे. शासकजातींची सत्तेच्या माध्यमातून चाललेल्या दडपशाहीमुळे आम्हा मूलनिवासी बहुजन समाजाला आपली जमिन गमवावी लागत आहे.

९. सेझ मध्ये सुपीक जमीनी विकल्या गेल्यामुळे या देशातील शेती बंद होऊन धान्याचे उत्पादन मोठया प्रमाणात घटले आहे. आज आपल्या देशाकडे जो काही धान्यसाठा उपलब्ध आहे ते प्रत्यक्षात फारच कमी व यादेशातील नागरिकांच्या अन्नाची आवश्यकता पूर्ण करु शकत नाही.

१०. आज जो काही धान्यसाठा उपलब्ध आहे त्यातून प्रत्येक व्यक्तीला केवळ ४७० ग्रॅम एवढेच अन्न मिळू शकते. प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी २२०० कॅलरी उर्जा मिळेल इतके अन्न आवश्यक असते. परंतु ४७० ग्रॅम अन्नातून एवढी उर्जा मिळणे अशक्य बाब आहे. त्यामुळे भुकेने मरण्याखेरीज आपल्यासमोर काही उपाय शिल्लक राहणार नाही.

११. फुड ॲंड ॲग्रीकल्चर ऑर्गनाझेशन (एफएओ) या संयुक्त राष्ट्र संघाच्या एका संस्थेच्या अहवालानुसार देशात ९६३ दश लक्ष (९६,३०,००,०००) लोक अन्नावाचून तडफडत आहेत. त्यातील २० टक्के अर्थात २० करोड पेक्षा जास्त लोक हे एकटया भारतात राहतात असे ही संस्था सांगते.

१२. हे अन्नावाचून तडफडणारे लोक मूलनिवासी बहुजन समाजातील आहेत आणि ते अन्न न मिळाल्यामुळे भुकेने तडफडून मरणे निश्चित आहे.

१३. जीवंत राहण्यासाठी पुरेसे अन्न विकत घेण्याची क्षमता आम्हा मूलनिवासी बहुजन समाजाच्या लोकांकडे उरलेली नाही. कारण महागाई प्रचंड प्रमाणात वाढवली गेली आहे. उदरनिर्वाहाच्या वस्तुंच्या किमतींमध्ये यावर्षी १८ टक्के पेक्षाजास्त दराने वाढ झालेली आहे. ही वाढ ग्राहक मूल्य सूचकांकांच्या मर्यादेपेक्षा १० टक्के जास्त आहे. यावरुन हे स्पष्ट आहे कि आम आदमी च्या विकासाचा नारा हा मूलनिवासी बहुजन समाजला मुर्ख बनविण्याचे थोतांड आहे.

१४. मूलनिवासी बहुजन समाजाची मते मिळवूनच शासकजातींचे लोक सत्तेत येतात. परंतु जेव्हा मूलनिवासी बहुजन समाजाच्या हिताची धोरणे ठरविण्याची वेळ येते तेव्हा हेच शासक जातीचे लोक त्यांच्या उद्योग आणि व्यापारात असलेल्या संबंधितांशी हात मिळवणी करुन त्यांचेच हित होईल असे कायदे बनवितात.

१५. या देशात ६५ टक्के संख्या असलेल्या शेतमजूरांच्या हिताचे कोणतेही आर्थिक धोरण शासक जातीचे लोक तयार करीत नाहीत,

१६. एवढेच नाही तर शासक जातीचे लोक असे आर्थिक धोरण निश्चित करतात आणि अशा व्यवस्था बनवितात कि ज्यामुळे सरकारी खजिन्यातून त्यांच्या खास लोकांना लाभ मिळेल आणि आर्थिक व्यवस्थेवर त्यांच्याच लोकांचे म्हणजेच ठरावीक उद्योगपती व व्यापा-यांचे नियंत्रण कायम राहील.

१७. याकरीता सार्वजनिक वित्त संस्था अर्थात सरकारी मालकीच्या बँकांद्वारे लाखो-करोडो रुपये उद्योग आणि व्यापाराकरीता आपल्या नातेवाईकांना वाटण्याचे काम शासक जातीचे लोक करीत आहेत. यापैकी दोन लाख करोड पेक्षा जास्त रुपये नॉन परफॉर्मिंग असेट (एनपीए) म्हणजेच बुडणारे कर्ज म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. अर्थात शासक जातींनी बँकांच्या माध्यमातून जे रुपये कर्ज म्हणून त्यांच्या काही व्यापारी व उद्योगपतिंना वाटली होती ती त्यांनी बुडविली व शासक जातींनी त्यांची कर्जे माफ करुन त्याला मोठया चालाकीने नॉन परफॉर्मिंग असेट (एनपीए) असे घोषित केले.

१८. दूसरीकडे लहान-लहान गरीब शेतक-यांनी जी छोटी कर्जे घेतली होती त्यांच्याकडून कठोरतेने कर्ज वसूली केली जाते व त्यांना मोठयाप्रमाणात त्रास दिला जातो. आधीच गरीब असलेले शेतकरी आपले कर्ज निर्धारित वेळेत परत करु शकत नाहीत आणि यातून वाचण्यासाठी म्हणून मजबूरीने आत्महत्या करतात.

१९. या देशात ६५ टक्के लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणा-या कृषी क्षेत्रातील अल्प कर्जधारक गरीब शेतक-यांचे थकीत कर्ज माफ करण्याचे जेव्हा-जेव्हा निर्णय होतात तेव्हा तेव्हा शासक जातीचे लोक याला कडाडून विरोध करतात. परंतु त्यांच्याच व्यापा-यांनी व उद्योगपतींनी बुडविलेल्या लाखो-करोडो रुपयांच्या कर्जाला शासक जातीचे सत्तेत बसलेले लोक विरोध करीत नाहीत.

२०. अशा प्रकारचे कारनामे लक्षात येऊ नये म्हणून शासक जाती चे लोक राम मंदिर ची निर्मिती सारखे विषय निर्माण करतात आणि ओबीसींच्या धार्मिक भावना भडकावून त्यांचे भावनिक शोषण करीत राहतात आणि आपली सत्ता कायम ठेवतात.

२१. काँग्रेसने आपलया २००४ च्या निवडणुक जाहिरनाम्यात घोषित केले होते कि लँड सिलींग कायद्याच्या माध्यमातून भूमिहिन लोकांना काही जमिन दिली जाईल आणि या करीता तसे एक विधेयक आणले जाईल परंतु आत्तापर्यंत तसे काहीही झालेले नाही.

# शैक्षणिक धोरण

१. एकीकडे अन्य विभागातील सरकारी कर्मचा-यांची संख्या कमी केली जात आहे व दूसरीकडे त्यांचे काम शिक्षकांवर गैरशिक्षकी कामाचे ओझे वारंवार लादले जात आहे.

२. परिणामी शिक्षकांचे लक्ष शिकविण्याकडे कमी होत आहे व मूलनिवासी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमधून गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळत नाही.

३. याला मार्ग म्हणून विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण न देताच पुढच्या वर्गात ढकलण्याचे धोरण शासक जातींनी बनिविले. अशा धोरणामुळे मूलनिवासी बहुजन समाजाचे विद्यार्थी अज्ञानी राहत आहेत व परिणामतः येत्या काळात ते ज्ञानाची मक्तेदारी असलेल्या लोकांचे गुलाम म्हणूनच राहणार.

४. अनुसूचित जाती आणि जमातीच्या कल्याणासाठी "स्पेशल कम्पोनण्ट प्लान" व "ट्रायबल सब प्लान" च्या अंतर्गत पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नाही.

५. जो फंड उपलब्ध राहतो त्याला वसतीगृहे आणि शिष्यवृत्तीसाठी योग्य प्रमाणात उपयोगात आणला जात नाही, उलट शासक जातींद्वारे तो फंड अन्य कामाकडे वळविला जातो किंवा तो खर्च न करता तसाच ठेवून वर्षाच्या शेवटी तो सरकारी तिजोरीत परत पाठविला जातो.

६. आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी शासक जातींचे काही लोक भ्रष्ट मार्गाने एस.सी., एस.टी. किंवा ओबीसी असल्याची खोटी प्रमाणपत्रे प्राप्त करुन आरक्षण खाऊन टाकतात. आणि दूसरीकडे अपप्रचार करतात की मागास जातीतील पुढारलेली मंडळी सर्वच्या सर्व आरक्षण खाऊन टाकत आहेत.

७. खोटी जात-जमात प्रमाणपत्रे प्राप्त करणा-यांना भारतीय दंड संहितेच्या अंतर्गत कठोर शिक्षा करण्याच्या ऐवजी, अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया फारच कठिण व गुंतागुंतीची करुन ठेवली आहे. जात-जमात प्रमाणपत्र

प्राप्त करण्यासाठी व जाती-जमातीची पडताळणी करण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांच्या जातीबाबतचे ५० वर्षाअगोदरचे पुरावे मागितले जात आहेत. जे दूसरे तिसरे काही नसून जात-जमात प्रमाणपत्र न देण्याचेच षडयंत्र आहे.

८. शिक्षक भरती प्रक्रियेत शासकजातीचे लोक भ्रष्ट प्रक्रियेचा अवलंब करतात, ज्यामुळे सरकारी शाळांमध्ये मूलनिवासी बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे योग्य शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

# आरक्षण धोरण

१. काँग्रेस ने आपल्या २००४ च्या जाहिरनाम्यात म्हंटले होते कि खाजगी क्षेत्रातील नोक-यांमध्ये अनुसूचित जाती व जमातींचा हिस्सा मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एकमत प्रस्थापित करेल. याव्यतिरिक्त काँग्रेसने असे देखील आश्वासन दिले होते कि या वर्गात उद्योजगता वाढविली जाईल. परंतु जेव्हा २००४ मध्ये युपीए सत्तेत आली तेव्हा आपल्या कॉमन मिनीमम प्रोग्राम मधून हीच बाब पुढे काढून टाकली.

२. खाजगीक्षेत्रातील आरक्षणाच्या सरकारच्या प्रस्तावाला व्यापार, व्यवसाय व उद्योगधंद्यांमध्ये बसलेल्या शासक जातींच्या लोकांनी सर्वशक्तीनिशी विरोध केला.

३. शासक जातींनी षड्यंत्र करुन मागास जातीतील काही जातींना वेगवेगळया राज्यात वेगवेगळया अनुसूचित टाकले आहे. एक जात जर एखाद्या राज्यात अनुसूचित जाती मध्ये आहे तर त्याच जातीला दूस-या राज्यात अनुसूचित जमाती व तिस-या राज्यात ओबीसीच्या सूचित टाकले आहे. अशाप्रकारे मागासवर्गीय जातींचे विभाजन करुन त्यांना सामुहिकरित्या ऐक्याचा लाभ मिळू न देण्यासाठी शासकजातींनी हा डावपेच आखला आहे.

४. प्रत्येक नागरिकाला आपल्या विकासासाठी देशात कुठेही निवास करण्याचा घटनादत्त अधिकार आहे. तरी मूलनिवासी समाजातील लोकांना अर्थात एससी, एसटी, ओबीसी व धर्मांतरित अल्पसंख्यकांना इतर राज्यात आरक्षणाचा लाभापासून वंचित ठेवले जाते. हे त्यांच्या मूलभूत अधिकाराचे हनन आहे.

५. लोकशाही ही प्रतिनिधित्वाद्वारे शासन अशी प्रणाली आहे. म्हणून कायदेमंडळ, प्रशासन व न्यायपालिके मध्ये आरक्षणाच्या माध्यमातून प्रतिनिधित्व करणे हा मूलनिवासी बहुजन समाजाचा घटनात्मक अधिकार आहे.

६. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक संस्था व सार्वजनिक सेवेत संविधानाच्या मौलिक अधिकाराच्या अंतर्गत अनुच्छेद १५ व १६ मध्ये आरक्षणाच्या माध्यमातून मूलनिवासी बहुजनांसाठी प्रतिनिधित्वाची व्यवस्था केलेली आहे.

७. भारतीय राज्य घटनेच्या कलम ३३० नुसार एससी आणि एसटी या वर्गाला कायदेमंडळात अर्थात लोकसभा व विधानसभेत आरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

८. सुरुवातीला हे राजकीय आरक्षण केवळ १० वर्षांसाठीच होते. शासक जातीचे लोक या आरक्षणाला प्रत्येक १० वर्षांनी वाढवित आहेत. ज्यामुळे त्यांना एससी व एसटी वर्गातून राजनैतिक गुलाम प्राप्त होत असतात. याच गुलामांच्या माध्यमातून शासक जातींचे लोक अनुसूचित जाती व जमातींवर आपले वर्चस्व कायम राखून आहेत.

९. परंतु जेव्हा मूलनिवासी बहुजन समाजाचे लोक शैक्षणिक संस्था आणि रोजगाराच्या क्षेत्रात आरक्षणासाठी संघर्ष करतात तेव्हा शासकजातींचे लोक प्रिंट मिडीयाच्या माध्यमातून खोटा प्रचार करतात कि आरक्षण हे केवळ दहा वर्षांकरीताच होते. हे आरक्षण केवळ संपविले पाहिजे. त्यांचा हा प्रचार केवळ निव्वळ खोटेपणाच नाही तर खोटेपणाची परिसीमा ओलांडण्याचेच कृत्य आहे.

१०. ओबीसी वर्गातील योग्य आणि सक्षम उमेदवारांना शैक्षणिक संस्थेत शिक्षण नाकारण्यासाठी प्रवेश व सार्वजनिक संस्थात रोजगाराच्या संधी मिळू नयेत याकरीता जाणीवपूर्वक क्रिमीलेयरचा नियम शासकजातींनी लागू केला आहे.

११. केवळ हेच नाही तर प्रत्येक वेळेला आरक्षित जागा भरत असतांना योग्य उमेदवार उपलब्ध नाहीत असा शेरा मारुन (अर्थात उमेदवारांना अयोग्य ठरवून) सतत जागा रिक्त ठेवून आरक्षण नाकारण्याचे षडयंत्र शासक जातीचे लोक करीत आहेत.

१२. शिक्षण व प्रशासनातील वरील प्रकारे आरक्षित जागा न भरल्यामुळे रिक्त राहिलेल्या जागांना सामान्य उमेदवारांकडून भरण्याचे निर्णय न्यायपालिकेत बसलेले शासकजातींचे प्रतिनिधी (न्यायाधीश) देत आहेत.

१३. केंद्र सरकारने अनुसूचित जाती आणि जमाती (पदे आणि सेवेतील आरक्षण) विधेयक २००८ पारित केले आहे.

१४. संविधानातील आरक्षणाची नीति ही मूळातच सकारात्मक आहे. परंतु वरील विधेयकाचा उपबंध ४(i) (iii) व (iv) असे म्हणतो की, सार्वजनिक संस्थातील श्रेणी "अ" मध्ये येणा-या सेवांमध्ये तेथील सर्वात खालची पदे सोडल्यास वरच्या पदांवर अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण मिळणार नाही. जी पदे शास्त्रीय किंवा तांत्रिक बाबींशी संबंधित आहेत, तसेच इंडियन इन्स्टीटयूट ऑफ मॅनेजमेंट व राष्ट्रीय स्तरावर महत्वपूर्ण असणा-या संस्था व तस्तम संस्थांमध्ये देखील श्रेणी "अ" मध्ये येणारी सेवांमध्ये खालच्या श्रेणीतील पदे सोडल्यास वरच्या पदांवर अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण मिळणार नाही.

१५. या कायद्याचा उपबंध ४ हा भारतीय राज्यघटनेच्या व स्वतः या कायद्याच्या शिर्षकाच्याच अत्यंत विरोधात आहे. कारण या विधेयकाचा मूळ उद्देश हा अनुसूचित जाती व जमातींना आरक्षण प्रदान करणे असा आहे. या विधेयकातील कलमांमध्येच आरक्षणाला नकार देण्यात आला आहे. अशाप्रकारे हे विधेयक अनुसूचित जाती व जमातींसाठी फारच घातक आहे.

१६. संविधानात नमूद सकारात्मक कृतीकार्यक्रमांच्या तरतुदी मूळात शासकजातींच्या मानसिकतेच्या विरोधात आहेत. जेव्हा अशी संविधानविरोधी मानसिकतेची लोकं सत्तेत बसलेले असतात तेव्हा या देशात समानता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुभाव या तत्वांवर आधारित एक लोकतंत्रात्मक समाज निर्माण करण्याच्या संविधानाच्या सिद्धांताच्या विरोधात काम करतात.

१७. थोडक्यात, वरील विधेयकाचा उपबंध ४(i) (iii) व (iv) हा शासक जातींच्या कुंठित मानसिकतेचे प्रतिबिंबच आहे.

१८. याव्यतिरिक्त, महिला आरक्षण विधेयक २००५ हे संसदेत मांडण्यात आले होते. हे बिल जसे आहे तसेच पास करण्याच्या विचारात शासक जातीचे लोक होते. परंतु त्यांना ते शक्य झाले नाही. या बिला मध्ये समता व न्याय या तत्वांचा आधार घेऊन महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. परंतु ३३ टक्केच का? याची कोणतीही तर्कसंगत उत्तरे त्यांनी दिलेली उपलब्ध नाहीत.

१९. महिला आरक्षण विधेयकाच्या संबंधात मूलनिवासी बहुजन समाजाचे केवळ इतकेच म्हणणे आहे की, त्या आरक्षणात मूलनिवासी महिलांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे. अर्थात प्रस्तावित ३३ टक्के आरक्षणामध्ये मूलनिवासी बहुजन समाजातील घटक एससी, एसटी, ओबीसी आणि धार्मिक अल्पसंख्यका व सामान्य श्रेणीच्या महिलांना संख्येच्या प्रमाणात आरक्षण असावे. कारण मूलनिवासी माहिला या सामान्य श्रेणीच्या महिलांच्या तुलनेत अधिक वंचित आहेत. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित होणे गरजेचे आहे. परंतु शासक जातीचे लोक मूलनिवासी महिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या प्रस्तावाला कोणताही तर्क न देता विरोध करीत आहेत.

२०. आमच्या मते, शासक जातींना वास्तविकतेची जाणीव झाली आहे कि आज नाही तर उद्या देशाचे प्रधानमंत्री पद मूलनिवासी बहुजन समाजासाठी सोडावे लागेल. कारण भारतात मूलनिवासी समाजाची लोकसंख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे मूलनिवासी समाजाचे लोक मोठया संख्येने निवडून जातील. म्हणून महिला आरक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या महिलांना निवडून पाठवून त्यांची संख्या ते संसदेत वाढवू इच्छित आहेत. केवळ याकरीताच ते मूलनिवासी बहुजन महिलांना या आरक्षणात प्रतिनिधित्व देण्यास विरोध करीत आहेत.

कारण ते पंतप्रधान पदाचे स्थान कायम हस्तगत करुन आपले वर्चस्व कायम ठेवू इच्छितात.

२१. केंद्रसरकारच्या मंत्रीमंडळाच्या कॅबीनेट मध्ये नुकतेच हे विधेयक मंजूर करुन घेतले आहे. आता ते संसदेच्या चालू सत्रात ठेवण्यात येणार आहे. संसदेतील काँग्रेस, भाजपा व कम्युनिस्ट या शासक जातीच्या पक्षांचे बलाबल जास्त असल्यामुळे हे बिल संसदेत निश्चित पास होणार आहे. एकीकडे लोकसभेत वर्तमान सत्ताधारी पक्षाकडे आता ३४८ सदस्य आहेत व केवळ ३४२ चे बहुमत पाहिजे तर दूसरीकडे राज्यसभेत १३७ सदस्य आहेत व बहुमतासाठी त्यांना १९ सदस्य आणखी पाहिजेत ते मिळविणे त्यांना कठीण नाही. हे बिल पास झाल्यानंतर इथूनपुढे मूलनिवासी बहुजन समाजाचा पंतप्रधान होणे शक्य नाही. याला केवळ मूलनिवासी बहुजन समाजच जबाबदार आहे.

२२. सच्चर समितीच्या अहवालाने मुस्लिम समुदायाचे सामाजिक व आर्थिक सशक्तीकरणाच्या दृष्टीने त्यांना आरक्षण देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. परंतु हे आरक्षण सामाजिक व शैक्षणिक आधारवर न ठेवता धार्मिक आधारावर देण्याचे सुचविले आहे. जर अशाप्रकारे धार्मिक आधारावर आरक्षण दिले गेले तर मुस्लिम समाजातील उच्चजातीचे लोक संपूर्ण आरक्षण हडप करतील आणि मागासलेले मुस्लीम वंचितच राहतील. असे झाले तर परिणामी या मागास मुस्लिमांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सशक्तीकरण होणार नाही. म्हणून धर्माच्या नावावर मुस्लिम समुदायांना आरक्षण देण्याचा प्रस्ताव हा उच्च जातीच्या मुस्लिमांकडून शासक जातींसोबत साटे-लोटे केले आहे हे सिद्ध होते.

२३. न्यायपालिकेवर शासकजातींचे अत्यंत मोठयाप्रमाणात वर्चस्व आहे. आणि ते न्यायाच्या नावावर मूलनिवासी बहुजनांसोबत अन्यायकारी निकाल देत आहेत. न्यायपालिकेत बसलेल्या शासकजातींच्या प्रतिनिधिंनी आरक्षण हा मूलभूत अधिकार नाही असा निकाल देणे हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे.

# अपील

मित्रांनो, याचे समाधान आपल्या मूलनिवासी बहुजन समाजाच्या हातात आहे. समाजाला जागृत करणे आणि मूलनिवासी या ओळखीच्या आधारावर समाजाला संघठीत करुन आपले योग्य व विश्वासु प्रतिनिधि शासन-प्रशासनात पाठविणे हा एकमात्र उपाय आहे. आम्हाला आशा हो कि आपण आपल्या सारासारविवेक बुद्धिचा उपयोग कराल आणि आपल्या महापुरुषांनी चिंतिलेल्या सामाजिक क्रांतीसाठी मूलनिवासी जनआंदोलनात सहभागी व्हाल.

# विनीत

**संजय इंगोले**
*राष्ट्रीय अध्यक्ष, मूलनिवासी संघ*
(विद्यार्थी आणि युवक)

**डॉ. मनिषा बांगर**
*राष्ट्रीय अध्यक्षा, मूलनिवासी महिला संघ*

**डॉ. पी. डी. सत्यपाल**
*राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ टिचर्स संघ*

**व्ही. एन. शिंगाडे**
*राष्ट्रीय अध्यक्ष, बामसेफ पेन्शनर्स संघ*

**धनंजय झाकर्डे**
*राष्ट्रीय अध्यक्ष, मूलनिवासी सांस्कृतिक संघ*

**प्रा. सुमन तिरपुडे**
*राष्ट्रीय अध्यक्षा, बामसेफ महिला विंग*

हे पत्रक वरील संघटनांचे केंद्रीय कार्यालय
घर नं. १०७९५, फूलवाली गली, मानकपुरा, करोलबाग, नई दिल्ली ११०००५
येथून प्रकाशित करण्यात आले.